| | |
|---|---|
| MHSO200015252022 | **नियमीत दिवाणी दावा नं.३७३/२०२२**<br>(सुंदराबाई चव्हाण व इतर वि.एकनाथ पवार व इतर) |

## नि. १९ खालील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जात प्रतिवादींचे कथन की, सदरचा दावा वादीने वाद मिळकतीची मोजणी होऊन अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेकरता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील वाद मिळकत जमीन गट नं. ८२३/५ मध्ये त्यांचे नावे क्षेत्र असून पूर्वीपासून ते स्वतः वहिवाटून उपभोग घेत आहेत. सदर दाव्याचे समन्स त्यांना मिळाले होते. परंतु, वयस्करपणामुळे व घरगुती अडचणीमुळे दाव्यासंदर्भात हजर राहून योग्य ती तजवीज करणे शक्य झाले नाही. वादीने प्रतिवादी नं.३ चे परस्पर खोटया मजकुराचा दावा दाखल करुन त्याचे सोईनुसार मोजणी करणेबाबत आदेश मिळविण्याचे प्रयत्नात असल्याबाबतची माहिती या प्रतिवादीस इतर प्रतिवादीकडून मिळाली. त्यानंतर दाव्यासंदर्भात अधिक चौकशी केली असता या प्रतिवादीविरुध्द एकतर्फा आदेश पारित झाल्याची माहिती मिळाली. सदर प्रतिवादीचे सध्याचे वय ८४ वर्षे आहे. तसेच त्याचे कुटुंबामध्ये तो स्वतः आजारी असल्याकारणाने दाव्याचे समन्स मिळालेचे प्रतिवादीचे लक्षात राहिले नाही. त्या कारणाने प्रतिवादीस हजर राहून मुदतीत दाव्यास कैफियत देता आली नाही. प्रतिवादीने जाणीवपूर्वक कैफियत देण्यास व हजर राहण्यास टाळाटाळ केलेली नाही. सबब, प्रतिवादी क्र.३ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन त्यांनी सोबत दिलेली दाव्याची कैफियत स्विकारण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

**३.** वादीने नि.२२ कडे म्हणणे दिले की, सदर अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी नं. ३ यास दाव्याचे समन्स मिळून सुध्दा जाणूनबुजून हजर होण्यास टाळाटाळ केली आहे. सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज प्रलंबित ठेवण्याकरिता सदरचा विलंब केला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर होणेची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.३ यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मोजणी होऊन अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.३ यांना दि. २२/१२/२०२२ रोजी समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. परंतु, त्यांनी मुदतीत हजर होऊन कैफियत दिली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. प्रतिवादीने विलंबाबाबत अर्जात नमूद असलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु, सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे. तरी सदरचा दावा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.२० खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे व त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१९ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांना नि.क्र.१७ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

PATIL ARTEE ASHOKRAO
Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2025.07.24 17:54:43 +0530

(**श्रीमती ए.ए.पाटील**)

दि. २४/०७/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | Smt. S.S.Kolekar |
| (b) | Court | :- | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 24/07/2025 |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 24/07/2025 |